**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ८७३२ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| हेमंत घन:शाम चोपडे | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, देहूरोड पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड | सहाय्यक पोलीस आयुक्त, देहूरोड विभाग, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |

**( सुनावणी दिनांक - २० / ०२ / २०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २७.११.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| **माहिती अर्ज दिनांक** | **माहितीचा तपशील** |
|---|---|
| १९.०८.२०२४ | दि. ०९.०८.२०२४ रोजी पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड येथे तक्रार अर्ज दाखल केला असून त्यावर केलेल्या कार्यवाहीची, त्याबाबतचे जाबजबाब, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांना पाठविण्यात आलेले अहवाल याबाबत माहिती |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. "

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २४.०९.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे. अपिलार्थी यांचे प्रथम अपील प्राप्त नाही. "

उपलब्ध अभिलेख व सुनावणी दरम्यान सादर केलेल्या कागदोपत्री अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २४.०९.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जात दि. ०९.०८.२०२४ रोजी पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड येथे तक्रार अर्ज दाखल केला असून त्यावर केलेल्या कार्यवाहीची, त्याबाबतचे जाबजबाब, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांना पाठविण्यात आलेले अहवाल याबाबत माहिती मागितली असून त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने अपिलार्थी यांचे समाधान झाले नाही. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये अर्जदारास दिनांक ०९.०८.२०२४ रोजीच्या तक्रारीप्रमाणे देहूरोड पोलीस स्टेशनकडे गु.र.न. ९६४/२०२५ दि. २९.१०.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२९ (३), ३२४ (४), ३२४ (५), ३ (५) सह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ चे कलम ३ (१), ३ (२) (७) अन्वये गुन्हा नोंद असून गुन्हाच तपास चालू असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०८.२०२४ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती देण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, देहूरोड विभाग, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असणारी व विहीत तरतूदीनूसार देय होणारी वस्तुनिष्ठ माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत डाकेने विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

२. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ८७३२ / २०२४ / पुणे 1642 दिनांक - 27/3/2026

**प्रत - माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय